अध्याय ९ वा

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्यो नमः । श्री कुलदेवतायै नमः । आता अैकावी गोड गीता । सांगतसे तुम्हा स्वतः । शांत ऐकावी चित्ता । श्रीधरे जी कथियली ।।

अभंग

पाहे तेथे राहे । नाही तेथे आहे । शोधूनिया पाहे । हृदया माजी ।।१।।
हृदयी पाहता । भासे जाता येता । नजरे न पडता । तोही आहे ।।२।।
थंडीचा थंडावा । तैसा लागे वारा । दोघांचा तो मारा । दिसेना तो ।।३।।
साखरेची गोडी । खाता ती आवडी । परि न सांपडी । शोधू जाता ।।४।।
दुधा माजी जैसे । नवनीत तैसे । पाहता ना दिसे । चर्म चक्षू ।।५।।
राहे जलांतरी । जंतु कितीतरी । दुर्बिणा भितरी । तेही दिसे ।।६।।
भक्तिची दुर्बिण । लाविताची नेत्री । दिसेल या क्षेत्री । विश्वरुप ।।७।।
न होता अधिर । धरोनिया धीर । करुनिया स्थिर । एक चित्त ।।८।।
एकचित्त होता । दिसे ती तत्वता । नाही वस्तू म्हणता । तिथे दिसे ।।९।।
देऊनिया ध्यान । पहावे निक्षून । वस्तुचि ती खूण । दिसू लागे ।।१०।।
श्रीधर स्वामींची । हृदयी ही गीता । घ्या हो जन हाता । प्रेमे तुम्ही ।।११।।
गीतेचे ते सार । पाहिले मी नेत्री । मानवाचे क्षेत्री । इहलोकी ।।१२।।
इंद्रियांचे घोडे । जुंपंनिया रथा । ठेवोनिया हाता । सर्व सुत्रे ।।१३।।
आत्मा हाचि कृष्ण । मन हे अर्जुन । करी समाधान । ज्ञानामृते ।।१४।।
दुष्ट हे विचार । कौरवाचे सार । षडरिपू बेजार । करी मना ।।१५।।
मनाची आसक्ति । षडरिपु तल्लीन । धजे न मन । मारावया ।।१६।।
पाहोनिया माया । लोक अहंकार । करी ते विचार । घाबरोनि ।।१७।।
मन म्हणे सर्व । प्रेमाचा पसारा । कैसा करु मारा । वैऱ्यापरी ।।१८।।
मायाधीन मन । झाले हतबल । विसरुनि बळ । आपुलेची ।।१९।।

आत्मा म्हणे मना । मारावी ही माया । तेव्हा होईल काया । बंधमुक्त ।।२०।।
देहाच्या कल्याणा । मारावी आसक्ति । प्रेमाची ही नाती । सोडोनिया ।।२१।।
जे जे येई आड । करावा पाडाव । पवित्र तो भाव । ठेऊनिया ।।२२।।
ऊठ मना वेड्या । होऊनि सावध । करावा तो वध । सर्वांचाही ।।२३।।
मरोनिया सर्व । स्वरुपी मिळेल । होई जैसा मेळ । तुझा माझा ।।२४।।
ऐशा परी केला । मना उपदेश । गीतेचा संदेश । सांगीतला ।।२५।।
श्रीधर स्वामींनी । धरुनिया ध्यान । जगकारणी ध्यान । लावियले ।।२६।।
व्यास मुनी सांगे । गीतेचा विस्तार । घेऊनिया सार । पार व्हावे ।।२७।।
वर्णिले पांडव । देहाचिया ठायी । पाहोनिया घेई । देही तुझ्या ।।२८।।
पंच महाभूति । पांडव हे पुत्र । सर्वांचे ते सूत्र । एकाहाती ।।२९।।
पृथ्वी वायु तेज । आप नि आकाश । तयाचा प्रकाश । हृदयी होई ।।३०।।
पृथ्वीचा तो धर्म । वायुचा तो भीम । तेजाचा अर्जुन । महावीर ।।३१।।
जळाचा तो भाव । नकुळ म्हणती । आकाशाचे पोटी । सहदेव ।।३२।।
पंडु त्यांचा पिता । कुंती त्यांची माता । सर्वांशी पाळता । एकदेव ।।३३।।
म्हणतात सर्व । कृष्ण देव त्यासी । पहावे तयाशी । आत्मरुपी ।।३४।।
नीतीचा सागर । धर्मामागे श्वान । तेचि हे इमान । सत्व पाहे ।।३५।।
आत्मबळ जाणा । भीमाचे ते बळ । त्याहुनी सबळ । दुजा नाही ।।३६।।
अर्जुनाचा गुण । करारी ती निष्ठा । त्याचीच प्रतिष्ठा । तीन्ही लोकी ।।३७।।
कुळाचा विचार । न करे नकुळ । सर्वांचा तो मेळ । त्याचे ठायी ।।३८।।
ऐसी ज्याची वृत्ती । तेथे राहे देव । तोचि सहदेव । ऐसे जाणा ।।३९।।
सुबुद्धींचे हे । जाणा भूत माहेर । करिती उद्धार । नर काया ।।४०।।
कुबुद्धी कौरव । विचार अनेक । विचारा फरक । एक मेका ।।४१।।

धृतराष्ट्र त्याचा। पिता तो आंधळा। येई अवकळा। जेथे तेथे ॥४२॥
कौरव पांडव। राहे एका स्थळी। परी ना आकळी। एक मेका ॥४३॥
दोघांचिही श्रद्धा। कृष्ण देवावरी। जाई त्याच्या घरी। साह्या लागी ॥४४॥
कौरव मागती। इंद्रियांची सेवा। मागती आत्मराणा। पंडुपुत्र ॥४५॥
इंद्रियाचे साह्ये। कौरव लढती। पांडवा मदती। आत्मदेव ॥४६॥
द्रौपदी ही बुद्धी। सत्याची प्रतिमा। म्हणोनिया दैना। झाली त्याची ॥४७॥
ऐसे अविचारी। करिता फजिती। पार नाही गति। मानवाच्या ॥४८॥
श्रीधर सांगे करा। पांडवांची साथ। मिळेल तो नाथ। हृदयीचा ॥४९॥
श्रीधर गीता ही वाचिता। जळतील त्याच्या व्यथा। येईल सौख्याचा सविता। जीवनात पूर्णपणे ॥५०॥ अष्टेकर हे सद्गुरु। बहुत भक्तांचे आधारु। सकळ जनांचे कल्पतरु। गुरुमाऊली ती माझी ॥५१॥ श्रीधर गीता त्यांनी कथिली। मी पामरे लिहीली। मानुन घ्यावी चांगली। मधुकर विनवितसे ॥५२॥ इति श्री बाळकृष्ण अष्टेकर चरित। मधुकर जोशी रचित। श्रीधर गीता कथीत । नवमोऽध्यायः ॥